# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २९६ - २३** **दिनांक : - ०२/०९/२०२३**

**खुनाच्या गुन्हयात फरारी, (प्रत्येकी ५०,०००/- रुपयांचे इनामी असलेले) गुन्हेगार पोलीसांचे जाळयात गुन्हे शाखा युनिट ०१ काशिमीरा व उत्तरप्रदेश वाराणसी एस.टी.एफ. यांना यश**

वाराणसी राज्य उत्तरप्रदेशचे एस.टी.एफ चे पोलीस निरीक्षक अमित श्रीवास्तव, पोलीस निरीक्षक अतुल कुमार सिंह व त्यांचे स्टाफ हे युनिट-१ कार्यालय येथे हजर राहून लेखी रिपोर्टाने कळविले कि, मेहरनगर पोलीस ठाणे, जिल्हा आजमगड, राज्य-उत्तरप्रदेश, गुन्हा रजी. क्रं. ३०८/२०२३, भा.द.वि.सं कलम ३०२,३६४,२०१,१२०(ब) मधील पाहीजे आरोपीत नामे १) रामविलास उर्फ बैलास शंकर यादव, वय-५५ वर्षे, रा. ग्राम मालपार, थाना मेहरनगर, जिल्हा आजमगड, राज्य उत्तरप्रदेश. २)दिनेश उर्फ गोलू रामविलास यादव, वय-१८ वर्षे,रा. ग्राम मालपार, थाना मेहरनगर, जिल्हा आजमगड, राज्य उत्तरप्रदेश. ३)अनिल सुभाष यादव, वय-२० वर्षे, रा. ग्राम मालपार, थाना मेहरनगर, जिल्हा आजमगड, राज्य उत्तरप्रदेश. ४)कमलेश मार्कंडेय यादव, रा. ग्राम मालपार, थाना मेहरनगर, जिल्हा आजमगड, राज्य उत्तरप्रदेश. यांचे नावाचे दिनांक २५/०८/२०२३ रोजी मा. सी.जी.एम कोर्ट जिल्हा न्यायालय आजमगड, राज्य उत्तर प्रदेश यांनी पकड/अटक वारंट जारी केलेले आहे.

दिनांक २९/०८/२०२३ रोजी मा. पोलीस महानिरीक्षक, आजमगड, राज्य-उ.प्र यांनी सदर गुन्ह्यातील पाहीजे आरोपीत यांची माहीती देणाऱ्यासाठी व अटक करण्यासाठी प्रत्येकी ५०,०००/- रुपयांचे इनाम घोषीत केलेले आहे.

सदर गुन्ह्याची थोडक्यात हकीगत अशी की, सन २००१ मध्ये वरील गुन्ह्यात पाहीजे आरोपीत नामे रामविलास यादव याचा मोठा भाऊ मयत मार्कंडेय यादव याला आरोपीताचे गावातील अवधेश यादव व इतर यांनी ठार केल्याचे आरोपावरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु सदर गुन्ह्यात पुढे जाऊन अवधेश यादव याचे नाव सदर गुन्ह्यातुन काढण्यात आले याचा राग मनात धरुन सन २०१९ मध्ये मयत मार्कंडेय यादव यांचा मुलगा सतीश यादव, पाहीजे आरोपीत नामे रामविलास यादव, अनिल यादव व इतर यांनी आवधेश यादव यास ठार मारले होते. त्यानंतर दि. २१/०२/२०२३ रोजी सन २०१९ मध्ये ठार मारलेले अवधेश यादव घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नामे दुलारे यादव याला वरील पाहीजे आरोपीतांनी ठार केल्यावरुन मेहरनगर पोलीस ठाणे, जिल्हा आजमगड, राज्य-उत्तरप्रदेश, येथे गु.रजी.क्रं-३०८/२०२३, भा.द.वि.सं कलम ३०२,३६४,२०१,१२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील पाहीजे आरोपीत नामे अनिल यादवयाचे मोबाईल लोकेशन मिरा भाईंदर परिसरात येत असल्याने विनंती करुन पोलीस मदत मागीतल्याने युनिट-१ चे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे यांनी स.पो.नि.प्रशांत गांगुर्डे, पो.हवा. पुष्पेंद्र थापा, सुधीर खोत व पो.अं. सनी सुर्यवंशी यांना आदेशीत करुन उत्तरप्रदेश एस.टी.एफ. पथकाबरोबर सदर पाहीजे आरोपीतास ताब्यात घेणे कामी रवाना करण्यात आले होते. तांत्रीक विश्लेषण वरुन वर नमुदपैकी पाहीजे आरोपीत नामे १) रामविलास उर्फ बैलास शंकर यादव, वय ५५ वर्षे, रा. ग्राम मालपार, थाना मेहरनगर, जिल्हा आजमगड, राज्य उत्तरप्रदेश. २) दिनेश उर्फ गोलू रामविलास यादव, वय १८ वर्षे, रा. ग्राम मालपार, थाना मेहरनगर, जिल्हा आजमगड, राज्य उत्तरप्रदेश. ३) अनिल सुभाष यादव, वय - २० वर्षे, रा. ग्राम मालपार, थाना मेहरनगर, जिल्हा आजमगड, राज्य उत्तरप्रदेश. यांना काशिमीरा

पोलीस ठाणे हद्दीतून ताब्यात घेण्यात आले व पुढील कार्यवाही कामी सदर पथकाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगीरी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे पो.हवा.पुष्पेंद्र थापा, समीर यादव, सुधिर खोत, पो.अं.सनी सुर्यवंशी तसेच उत्तरप्रदेशचे एस.टी.एफ चे पोलीस निरीक्षक अमित श्रीवास्तव, पोलीस निरीक्षक अतुल कुमार सिंह, पो.उ.निरी अंगद यादव, पोलीस हवालदार रवि शंकर यादव, वैजनाथ राम, धनंजय श्रिवास्तव, अरविंद सिंह, राहुल सिंह, विनय मौर्या यांनी केली आहे.



**----0000----**